आर. सी.सी. क्र. २१/२०१८

शासन – वि – वसंता

नि. क्र. **३०**

सरकार तर्फे साक्षीदार क्र. २ ची साक्ष शपथेवर सुरु

सुरज अशोक मोकळे

वयः २३ वर्षे धंदाः मजुरी

रा. कोलामपोड, ता. केळापुर जि. यवतमाळ

**सर तपासणी सरकारी वकील ए.के. शाह यांचे मार्फतः–**

मी आरोपी वसंता याला ओळखतो कारण तो माझ्या घराजवळ राहत होता. मी फिर्यादी बापुराव यसाला ओळखत नाही. घटना कधी घडली व काय घडली हे मला माहित नाही. असे काही काही झाले नाही की, मी माझ्या घरासमोर उभा असतांना शेशिकला हिच्या घरी तिचे वडील बापुराव आले होते. आरोपी वसंता याने त्याला डोक्यावर काठीने मारुन जखमी केले.

**सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याने विदयमान सरकारी अभियोक्तांनी सदर साक्षीदार फितूर घोषीत करण्याची परवानगी मागीतली. साक्षीदारास फितूर घोषीत करण्यात येते व उलट तपासणीची परवानगी देण्यात येते.**

हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराजवळ शेशिकला बावने व वसंत किनाके हे राहत होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी वसंता हा दारुपिण्याच्या सवईचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १५/०१/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजताच्या दरम्यान मी माझ्या घरासमोर उभा होतो. हे म्हणणे खरे नाही की, सदरच्या दिवसी शेशिकला हिचे वडील बापुराव तिच्या घरी आला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष वसंता याने बापुराव याच्या डोक्यावर व अंगावर काठीने मारुन जखमी केले. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हा शेशिकला हिने तिच्या वडीलाल दवाखाण्यात नेले. आता मला माझ्या बयानातील **अधोरेखांकित भाग अ** वाचुन दाखवीण्यात आला, सदरचे मजकुर चुकिचे आहे, सदरचे मजकुर पोलिसांनी माझ्या बयानात का लिहले याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला वाचवीण्यासाठी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास आरोपी तर्फे ॲड. डि.एस. भगत**

नाकारली

फेर तपास काही नाही

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

२रे न्यायदंडधिकारी प्रथम श्रेणी

केळापूर

दिनांकः ०३/०२/२०२०

माझे समक्ष

(जी. ओ. वानखडे)

२रे न्यायदंडधिकारी प्रथम श्रेणी

केळापूर

दिनांकः ०३/०२/२०२०